५५७१८

जा.क्र पोउआ/विशा/राजकीय/ ६०८५/२०१७
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :१२ /१०/२०१७

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**आदेश,**

ज्याअर्थी,महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग,पत्र.क्र.रानिआ/ग्रामपंचायत/निवडणुक/-२०१७ /प्र.क्र.१७-/का.८ दिनांक ०१/०९/२०१७ च्या आदेशान्वये हवेली तालुक्यातील मुदत संपणा-या ग्रामपंचायतींचा निवडणुक कार्यक्रम जाहीर केला असुन, हवेली तालुक्यातील आठ ग्रामपंचायतीची मतमोजणी दिनांक १७/१०/२०१७ रोजी शिवाजीनगर धान्य गोडावुन सी-५ व सी-६ बरॅक, शिवाजीनगर, पुणे. याठिकाणी होणार आहे.

सदर मतमोजणीची प्रक्रिया सुरळीतपणे व शांततेत पार पडण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था राखणेकामी, सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सार्वजनिक उपद्रव टाळण्यासाठी "शिवाजीनगर धान्य गोडावुन सी-५ व सी-६ बरॅक,शिवाजीनगर पुणे." येथील २०० मीटर परिसरात दिनांक १७/१०/२०१७ रोजीचे ००:०१ वा. पासुन ते मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीत निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी , मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, शिवाजीनगर धान्य गोडावुन सी-५ व सी-६ बरॅक, शिवाजीनगर पुणे. येथील २०० मीटर परिसरात दिनांक १७/१०/२०१७ चे ००.०१ वा. पासून ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१) मतमोजणीच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अधिकृत-अनाधिकृत हत्यारे तसेच परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवून फिरणेस या आदेशान्वये मनाई करीत आहे.

सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकिय कर्मचाऱ्यांना (पोलीस दल, सरंक्षण दल, तुरूंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना ) लागु राहणार नाही. तसेच ज्या परवाना धारकास रूढीप्रमाणे बंदूक प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे त्यांना हा आदेश लागू राहणार नाही.

२) मतमोजणीच्या परिसरात मोबाईल, कॉर्डलेस फोन, वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे. (कर्तव्यावर असणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागू राहणार नाही.)

३) मतमोजणीच्या परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) मतमोजणीच्या परिसरात कोणताही मजकूर लिहण्यास अगर छापील मजकूर प्रदर्शित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

५) मतमोजणीच्या परिसरात शासकीय वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

६) मतमोजणीच्या परिसरात अधिकृत पासाशिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

७) मतमोजणीचा निकाल जाहिर झाल्यानंतर दिनांक १७/१०/२०१७ रोजी विजयी मिरवणुका काढण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक १२/१०/२०१७ रोजी दिला आहे.